# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
०२०- २५६०१२५८
०२०- २५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: dyracademic@unipune.ac.in

संदर्भ : सीसीओ/९८०

दिनांक : १०/०५/२०१९

मा. प्राचार्य / सचिव
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक

विषय: स्थानिक निवड समितीने शिफारस करून नियुक्त केलेल्या उमेदवारांचे व तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर करण्याबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. Misc-2018/C.R.56/18/UNI-1 Dtd. 8 March 2019

२) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली १ मार्च, २०१९ यांच्या संदर्भातील भारतीय राजपत्र क्र. ८२.

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ याचे अवलोकन करून शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या उमेदवारांचे निवड समिती अहवाल व शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहीत मुदतीत या विभागात सादर करण्याबाबत आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षासाठी स्थानिक निवड समितीच्या अहवालानुसार नेमणूक करण्यात आलेल्या उमेदवारांच्या शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव दि. १ जून ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीत निवड समितीची सभा आयोजित करण्यात आलेल्या दिनांकापासून ७२ तासाच्या आत निवड समिती अहवाल विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात सादर करणे आवश्यक आहे. तसेच दि. १ जून ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीत रूजू दिनांकापासून ३० दिवसांच्या आत ऑनलाईन पद्धतीने शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव भरून तसेच निवड समिती अहवाल हार्ड कॉपी व सीडी (**PDF Only**) ३० दिवसांच्या आत सादर करावी.

२) महाविद्यालये / संस्थांकडून ज्या उमेदवारांची २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठी स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्ती होऊन शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर केले असतील असे उमेदवार किंवा ज्यांना शिक्षक मान्यता मिळाली असेल असे शिक्षक त्यांनी महाविद्यालय / संस्था सोडले असेल तर अशा उमेदवारांच्या जागी नवीन उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव ऑनलाईन भरण्यासाठी शैक्षणिक विभागातील संबंधित अधिका-याची मान्यता घेऊन संबंधित महाविद्यालयापुरतेच (नोकरी सोडून गेलेल्या शिक्षकांना संबंधित महाविद्यालयाने /संस्थेने रितसर रिलिव्हींग पत्र देणे आवश्यक आहे) संकेतस्थळ खुले करून देण्यात येईल.

३) तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारांच्या मान्यतेचे प्रस्ताव सादर करण्यासाठी शासनाचे दि. १४ नोव्हेंबर, २०१८ चे निर्णय निर्गमित केलेला असून त्यात नमूद केल्याप्रमाणे नियम व अटी पूर्ण करीत असलेल्या संस्था व महाविद्यालयांनी दि. १ जुलै २०१९ ते ३१ ऑगस्ट, २०१९ या कालावधीत ऑनलाईन भरून याच कालावधीत त्याची हार्ड कॉपी व सीडी या विभागात सादर करावी.

उपरोक्त नमूद केलेल्या कालावधीमध्ये शैक्षणिक वर्षासाठीचे तासिका तत्वावरचे प्रस्ताव सादर करावे. सदर तारखेनंतर शैक्षणिक वर्षासाठीचे व तासिका तत्वावरचे प्रस्ताव सादर केल्यास व अपूर्ण प्रस्ताव सादर केल्यास त्यावर या विभागाकडून कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

१०/५/१९

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)